दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.१३ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 13 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 83 | Pages 4 | Rate 4 Rs


## कोर्ट आम्हाला न्याय देईल हा विश्वास

**मुंबई–** आमदार अनिल परब यांनीही आजच्या सुनावणीविषयी आपण आशादायी असल्याचे म्हटले आहे. आम्ही नेहमीप्रमाणे आशावादी आहे. कोर्ट आम्हाला न्याय देईल हा विश्वास आहे. अपेक्षा करणे हेच आमचे काम आहे, असे ते म्हणाले. एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी खासदार संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी त्यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांना फोन केला होता. अनिल परब यांनी त्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, एकमेकांच्या प्रकृतीची चौकशी करणे ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्याचा राजकारणाशी कोणताही संबंध नाही. कुणी कुणालाही फोन करू शकतो. एखाद्याची प्रकृती बरी नसेल तर त्याला फोन करण्यात काही गैर आहे असे मला वाटत नाही, असे ते म्हणाले.

# फुकटचा ताठा अन् नाव उबाठा:एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका

## खरे दगाबाज कोण हे जनतेने ओळखले–एकनाथ शिंदे



दैनिक वादळ वार्ता

**परभणी (वृत्तसंस्था)**

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी अतिवृष्टी अनुदानाच्या मुद्यावरून मराठवाड्याचा दौरा करत महायुती सरकारवर 'दगाबाज' म्हणत टीका केली होती. या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाडा दौऱ्यावर असताना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेसच्या दावणीला शिवसेना कोणी बांधली? खरे दगाबाज कोण हे जनतेने ओळखले आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर पलटवार केला. तसेच, ठाकरेंनी मराठवाड्याचा दौरा करताना शेतकऱ्यांना 'एक बिस्किटचा पुडाही' दिला नाही, अशी खोचक टीका करत 'फुकटचा ताठा अन् नाव उबाठा' असा उपरोधिक हल्लाबोलही केला.उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठवाड्याचा दौरा करून, अतिवृष्टी अनुदानावरून महायुती सरकारला 'दगाबाज' संबोधले होते आणि मतदारांना त्यांना 'वोटबंदी' करण्याचे आवाहन केले होते. या आरोपांचा समाचार घेण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी आज मराठवाड्यातील परभणी येथे आयोजित केलेल्या त्यांच्या पक्षाच्या मेळाव्यात जोरदार प्रत्युत्तर दिले. आपल्या भाषणात शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर खोचक टीका करताना, नुसता फुकटचा ताठा अन् नाव उबाठा असे म्हटले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मराठवाड्यात नुसतेच येऊन गेले, साधा बिस्किटचा पुडाही देऊन गेले नाहीत. माझ्या हातात काही नाही, असे ते म्हणाले. पण जेव्हा त्यांच्या हातात सत्ता होती, तेव्हा तरी त्यांनी काही दिले होते का? असा सवाल त्यांनी केला. आम्हाला दगाबाज म्हणता, पण खरी दगाबाजी कुणी केली? काँग्रेसच्या दावणीला शिवसेना कुणी बांधली? हे जनतेने ओळखले आहे. म्हणूनच जनता आमच्या पाठीशी ठाम उभी आहे, असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंच्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले.



## जि.प.उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पुजन करून विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण व पुस्तकावर जिवापाड प्रेम करणारे होते.त्यांचा शाळेतील पहिला प्रवेश दिन.त्यांनी प्रताप सिंग हायस्कुल सातारा या शाळेत दि.७ नोव्हेंबर रोजी प्रवेश घेतला होता. दि.७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला.अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज याशाळेचे अपग्रेड



मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेतील पदवीधरशिक्षक डॉ.रामकिशन मुळे सर, संदीप ठोंबरे सर यांनी सखोल माहिती देऊन मार्गदर्शन केले.शिक्षक सर्वश्री आकाश लोंढे, राहुल बचुटे,धपाटे आबासाहेब, शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली,ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षिका,पी एम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार श्रीमती सुवर्णमाला पवार, विद्यार्थी,विद्यार्थीनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गा तील विद्यार्थीनी सिध्दी विजय थोरात हिने केले. शेवटी शिक्षक राहुल बचुटे सर यांनी आभार मानले.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी 'आयुष्मान' सुरक्षा कवच: १००% कार्ड निर्मितीसाठी विशेष मोहीम


दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र शासनाच्या राज्य आरोग्य हमी सोसायटी ने राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण आरोग्य सुरक्षा कवच योजना १००% लागू करण्यासाठी कंबर कसली आहे. एकत्रित आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत, सर्व सरकारी कर्मचाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आयुष्मान कार्ड १००% बनवण्याचे निर्देश सर्व जिल्हा प्रशासनांना देण्यात आले आहेत. शासनाच्या या योजनेमुळे राज्यातील कार्यरत तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. योजनेनुसार, प्रत्येक पात्र कुटुंबाला प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विषयक लाभ मिळणार आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब चव्हाण (भा.प्र.से.) यांनी १० नोव्हेंबर २०२५ रोजी या संदर्भात सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सिंधुदुर्ग वगळून) तातडीचे पत्र पाठवले आहे. या पत्रात विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या यशस्वी मॉडेलचा उल्लेख करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनाने विशेष शिबिरांचे आयोजन करून जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा परिषद अशा महत्त्वाच्या ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांचे आयुष्मान कार्ड तयार करण्याची कार्यवाही प्रभावीपणे सुरू केली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीने आता सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या धर्तीवर इतर सर्व जिल्ह्यांना तातडीने कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. या कार्यक्रमांतर्गत, प्रत्येक शासकीय कार्यालयात कार्ड निर्मितीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी आशा सेविका आणि आरोग्यमित्र यांच्या मदतीने विशेष शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या माध्यमातून, कर्मचाऱ्यांना स्वतःचे आणि कुटुंबातील सदस्यांचे इशपशळलळरी डेसळप द्वारे कार्ड बनवण्यासाठी मदत केली जाईल. या संपूर्ण प्रक्रियेचा अहवाल राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे सादर करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

## केज तालुक्यात संघर्ष योध्दा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक




दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यात आला होता त्यानंतर जरांगे पाटील यांनी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज देखील केला आहे तसेच मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे की नार्को टेस्ट मध्ये काय दुध का दुध पाणी का पाणी एकदा कळेलच परंतु सहा कोटी मराठा समाज संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांना देव मानत आहे व त्यांना जिवे मारण्याचा कट रचने म्हणजे सहा कोटी मराठा समाजाला मारल्या सारखे आहे व तसेच परळी तालुक्यात धनंजय मुंडे समर्थका कडुन संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेची विटंबना केली त्यांचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी करत संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील चौक केवड येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धा अभिषेक करण्यात आला आहे यावेळी केज तालुक्यातील चिंचोली माळी,केवड, वरपगाव,प्रींप्री,काळेगाव घाट येथील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

## संविधानाच्या ७५ वर्षांनिमित्त एकलव्य महाविद्यालयात 'संविधान जागर' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या ऐतिहासिक निमित्ताने, संविधानाचे महत्त्व आणि त्यातील तत्त्वे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यभरात विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. याच शृंखलेचा एक भाग म्हणून, नंदुरबार शहरात अनुलोम संस्थेच्या वतीने 'संविधान जागर' या विशेष कार्यक्रमाचे एकलव्य महाविद्यालयात यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या या महत्त्वपूर्ण दस्तऐवजाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आणि विशेषतः देशाच्या भविष्याचा आधार असलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे हा होता.



> **संविधानाच्या ७५ व्या वर्षात आपण पदार्पण करत असताना, प्रत्येक नागरिकाला संविधानाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. विशेषत: युवा पिढीने या मूल्यांचे जतन करून देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे.**
> **अँड. प्रीतम निकम, अनुलोम संस्था.**

यावेळी अनुलोम संस्थेचे प्रतिनिधी अँड. प्रीतम निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि धर्मनिरपेक्षता यांसारख्या महत्त्वाच्या मूल्यांवर प्रकाश टाकला. संविधानाच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचे महत्त्व आणि आजच्या काळात त्याची प्रासंगिकता यावर त्यांनी जोर दिला.

संविधान जागर कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि उपस्थितांना संविधानाच्या निर्मितीचा उद्देश आणि त्यामागील प्रेरणा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता आली, ज्यामुळे हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

## संवेदनशील व जबाबदार विद्यार्थी घडवणे महत्त्वाचे–डॉ.इब्राहिम नदाफ

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**


दि.१२ नोव्हेंबर बुधवार रोजी येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात सुलभकांचे जिल्हास्तरीय मुल्यवर्धन प्रशिक्षण ३.० चे उद्घाटन प्रसंगी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ.इब्राहिम नदाफ सर बोलत होते.आज तुमच्या चेहऱ्यावर आनंद दिसतोय तो या आधी झालेल्या प्रशिक्षणाचे परिणामकारकता आहे. समाजातील वर्तनात सुधारणा करण्यासाठी, व्याख्यान पध्दतीने अध्यापना ज्ञान न देता अनुभुती मधुन,काव्य, कविताच्या माध्यमातून अध्यापन करुन मुलां मधील मुल्यवर्धित करावयाची आहेत.तसेच मुल्य रुजवायची आहेत. या मुलांमध्ये मुल्य रुजवून वर्धित झाल्यास विद्यार्थ्यां मध्ये संवेदनशिलता येईल व जवाबदारी घेण्यास ते निश्चित समक्ष बनतील व देशाला आहे.असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. शांतीलाल मुथा फाउंडेशन चे श्री.राजेश्वर यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.योगेश सुरवसे यांनी यावेळी आपण एकात्मिकपद्धतीने अध्यापन



करु त्यावेळेस आपोआप मुल्य शिकवले जातील मुल्यवर्धन प्रशिक्षणातून ऊर्जा मिळणार आहे.तसेच प्रशिक्षणाची पार्श्वभूमी मांडली.यावेळी सदर प्रशिक्षण हे दुस-या टप्यात चार चार दिवस निवासी स्वरूपाचे असुन पहिल्या टप्प्यात २५० व दुसऱ्या टप्प्यात २००असे प्रशिक्षणार्थी सहभागी होणार आहेत.पहिल्या टप्प्यात केज, पाटोदा, आष्टी,धारुर,परळी, अंबाजोगाई दि.१२ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे तसेच दुसरा टप्पा १९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीत संपन्न होत आहे.या वेळी व्यासपीठावर अँड. उद्धवराव कराड,जेष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे,जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.राजेश गोरे उपस्थित होते.तर पहिल्या टप्प्यातील सर्व शिक्षक,शिक्षिकाउपस्थित होत्या कार्यक्रमाचे सुत्र संचालन अरुण शिंदे, यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.कविता गित्ते-कराड मॅडम यांनी मांडले कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख मॅडम,पवन चंदनशिव,कृष्णा नागरगोजे यांच्या संचाने स्वागतगीत गायन करुन करण्यात आले.

संपादकीय

# दहशतवाद परतलाय



राजधानी दिल्लीत भीषण बॉम्बस्फोट झाला आणि तोही अशा भागात जेव्हा दिवसाच्या प्रत्येक प्रहरी हा भाग गजबजलेला असतो. लालकिल्ल्याच्या ऐतिहासिक परिसरात भीषण बॉम्बस्फोट होऊन १४ जण ठार झाले, तर कित्येक जखमी झाले. या भागात पूर्वी दहशतवादी बॉम्बस्फोट घडवायचे. १४ वर्षांनंतर पुन्हा त्या भीषण आणि दहशतवादी दिवसांची आठवण ताजी झाली. गर्दीने गजबजलेला हा भाग आता मातम करण्यात बदलून गेलाय. दशकभराच्या कालावधीपासून सुखाने मार्गक्रमण करणाऱ्या लोकांच्या जीवनात या स्फोटाने उथलपुथल माजवली. लोक पुन्हा एकदा अशांत पर्व अनुभवत आहेत. या स्फोटाच्या अगोदर म्हणजे १० नोव्हेंबरला फरिदाबाद येथे एका काश्मिरी डॉक्टरला अटक करून त्याच्याकडून ३६० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. या घटनेचा सदर बॉम्बस्फोटाशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. पुलवामा येथे झालेल्या स्फोटाशी या स्फोटाच्या सूत्रधाराचा संबंध असावा असा संशय आहे. एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्थेने हा तपास आता हाती घेतला आहे आणि त्यातून नक्की काय ते समोर येईल. दहशतवाद्यांविरोधात आवश्यक ती पावले उचलली जात आहेत आणि यूएपीए म्हणजे पूर्वीचा टाडा कायदा दिल्ली परिसरात लागू करण्यात आला आहे. याचा अर्थ उघड आहे, तो म्हणजे दहशतवाद्यांना भारताची आगेकूच सहन होत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा दहशतवादाचा मार्ग अवलंबला आहे. पण हा भारत मोदी यांचा आहे. त्यामुळे येथे जशाला तसेच उत्तर दिले जाते.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानने भारताला पुन्हा आपण दहशतवादी हल्ले करून जेरीस आणू शकतो हे विसरून जावे कारण आता निषेधाचे पत्रक काढून शांत बसणारे सरकार नाही. आज वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत या हल्ल्यानंतर जी छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यावरून हे लक्षात येते, की दहशतवाद्यांनी स्फोट घडवल्यावर सर्वत्र अफरातफरीचे आणि गोंधळाचे वातावरण होते. पण सर्वच घटनांनंतर असेच घडते. या स्फोटानंतर जी बातमी येत आहे ती जास्तच धोकादायक आहे, ती म्हणजे आयसी ८१४ च्या अपहरणांतर दहशतवाद्याची अदलाबदल झाली. त्यानंतर असलेली जैश-ई-अहमद ही संघटना या स्फोटामागे असावी का, याचा विचार सुरू आहे. लालकिल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटामागे तीन पुरुष आणि एक महिला होत्या. ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतात घुसखोरी केली होती. या स्फोटामुळे भारताला चोख उत्तर द्यावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या भूतान दौऱ्यावर आहेत पण त्यांनी देशवासीयांना दिलासा दिला आहे, की दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले जाईल. ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस पंतप्रधानांचे उत्तर किती चोख असते आणि दहशतवाद्यांना कसे त्यांचे सरकार त्यांच्या आकांपर्यंत जाऊन त्यांना धडा शिकवतात हे देशाने मागेच पाहिले आहे. त्यामुळे मोदी जे बोलतात ते करून दाखवतात यावर जनतेचा विश्वास आहे.या स्फोटाची सूत्रधार मसूद अझरची बहीण शाहीन असल्याचे स्पष्ट झाले. तिचे एकच काम होते ते म्हणजे तरुणांना दहशतवादी कृत्ये करण्यास भाग पाडणे. दिल्ली धमाक्यांनंतर आता पाकिस्तानात घबराट पसरली आहे आणि हा दहशतवादी हल्ला होता. अर्थात हा सामान्य बॉम्बस्फोट नाही. सुरुवातीच्या तपासात ही बाब समोर आली आहे, की शाहीनने घाई गडबडीत लोकांना ठार मारण्याचा कट घडवण्यात आला. पाकिस्तान या हल्ल्यामुळे पॅनिक मोडमध्ये आहे आणि नरेंद्र मोदी स्फोटाला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाहीत असे सांगत आहेत. मोदी म्हणाले, की या षड्यंत्राला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाही आणि त्यांच्या या म्हणण्याला अर्थ आहे. पाकच्या मांडीवर बसून दहशतवादी कारवाया करणाऱ्यांना मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळेस चांगला धडा शिकवला होता पण तो पुरेसा नाही. यामुळे पाक परत त्याच दहशतवादाच्या मार्गाने गेला आहे. त्याचा खामियाजा त्याला भोगावा लागणार आहे.दिल्लीत लालकिल्ला परिसरात झालेल्या बॉम्बस्फोटात पोलिसांना दहशतवादाचा संशय आहे. त्यामुळे अपराध्यांना कडक शासन होऊन जे निरपराध नागरिक यात बळी पडले आहेत त्यांना न्याय मिळण्याची व्यवस्था सरकारने करायला हवी. मोदीही त्याच मानसिकतेतून जात आहेत. त्यामुळे स्फोटाच्या सूत्रधारांना धडा शिकवला जाणार हे स्पष्ट आहे. या स्फोट प्रकरणी तारिक अहमद मलिक हा आणखी एक संशयित आहे आणि त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. याच हल्ल्यानंतर हाफीझ सईदचा एक व्हिडीओ समोर आला आहे, त्यात त्याने भारतावर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. देशभरात आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली असून विविध गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा या सर्व कामाला लागल्या आहेत. पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तय्यबा भारतावर मोठ्या प्रमाणात हल्ले करण्याचा कट आखत आहेत अशी ती बातमी निश्चितच भारतीयांची झोप उडवणारी आहे. कारण भारताची आर्थिक, क्रीडा आणि विज्ञान क्षेत्रातील भरारी पाकची झोप उडवणारी आहे. भारताच्या मुलींनी विश्वचषक जिंकला आणि भारताचा पुरुष संघ तर कधीचाच पुढे आहे. त्यातच भारताने चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असा लौकिक मिळवला आहे आणि भारताने इस्रोच्या मदतीने अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे पाक अस्वस्थ होणे साहजिक आहे. पण आता काँग्रेसचे लेचेपेचे सरकार नाही. मनमोहन सिंग एकदा म्हणाले होते, की या देशातील साधनसामग्रीवर पहिला हक्क अल्पसंख्याकांचा आहे. पण मनमोहन सत्तेतून गेले आणि पाक तसेच दहशतवाद्यांचे लाडही थांबले. आता येथे अल्पसंख्याकांना जशास तसे वागून त्यांना चोख धडा शिकवणारे सरकार आहे, पहलगाम हल्ल्याच्या वेळेसच मोदी यांनी याची चुणूक दाखवली होती. पाक हल्ल्याची जबाबदारी सरळ नाकारेल आणि दहशतवादी आमचे नाहीत असे सांगेल; परंतु पाकच्या कांगाव्याला भारत आता सावरला आहे आणि पाकच्या तंगड्या त्याच्याच गळ्यात कशा अडकावच्या ते भारताला चांगले माहीत आहे, कारण हा मोदी यांचा भारत आहे.

# पालकांनी बालकांशी पालकासम वागणे



बालकदिनाचा खरा उद्देश म्हणजे बालक आपल्या समाजाचे भविष्य आहे याचे स्मरण समाजाला होणे आणि हे भविष्य सुरक्षित असावे म्हणून बालकांप्रती समाजाच्या जबाबदारीची जाणीव वाढीस लागणे. प्रत्यक्षात एक सामाजिक घटक म्हणून किंवा पालक म्हणून आपली वागणूक बालकदिनाच्या उद्देशाला पूरक आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. १४ नोव्हेंबरच्या बालदिनाच्या पार्श्वभूमीवर ही संधी घेता येते.शीर्षक वाचून मनात गोंधळ उडाला असणार. हरकत नाही. बालक आणि पालक यांचे एकमेकांशी कसे संबंध असावेत, हा विषय कायमच ज्वलंत राहणार आहे. प्रामुख्याने हे संबंध तपासताना आमचे पालक, आमचे लहानपण, आमचे पालकपण... या फुटपट्ट्या लावल्या जातात आणि नेमका तिथेच गोंधळ होतो. असो. निमित्त आहे बालक दिनाचे आणि नुकताच 'केबीसी'मध्ये इशित भट्ट हॉट सीटवर विराजमान झाल्यानंतरचा प्रसंग. या प्रसंगाच्या खोलात शिरण्याची गरज नाही, कारण तो सगळ्यांना माहीत आहे. या प्रसंगावर पालक, शिक्षक, समुपदेशक, बालमानसशास्त्रज्ञ, लाईफ कोच सगळ्यांनाच व्यक्त व्हावंसं वाटलं. त्यांनी लिखाणातून आपली मतं मांडली. सामान्य जनतेने गप्पांमधून, बडबड करून यथेच्छ तोंडसुख घेतलं. कुणी समाजमाध्यमाला, कुणी पालकत्वाला, कुणी शिक्षणपद्धतीला, कुणी संस्कारशून्य पिढीला तर कुणी विभक्त कुटुंबपद्धतीला जबाबदार ठरवलं. खरं तर, दुसऱ्याकडे बोट दाखवलं की उरलेल्या तीन बोटांची दिशा स्वतःकडे असते, हा साधा नियम आपण विसरून गेलोय. समोरच्याला दोषी ठरवण्यासाठी आम्ही इतके उतावीळ, उत्तेजित आणि सर्वज्ञानी असतो की त्या भरात तारतम्य न ठेवता भाष्य करण्याचीच आम्हाला प्रौढी वाटते. किंबहुना, त्यासाठी हल्ली काही ना काही निमित्तच हवं असतं आणि तसं नसेल तर ते निमित्त शोधून काढलं जातं. त्यावर चर्चेचा धुरळा उडतो. मतमतांतरांचं मंथन होतं आणि काहीही निष्पन्न न होताच सगळं काही शांत होतं, विस्मरणात जातं.इशीत भट्ट हा लहान मुलगा. जेमतेम दहा - बारा वर्षांचा मुलगा. या वयाची मुलं आपल्या घरात असली की हल्लीची पिढी काय हुषार आहे नाही, हे वाक्य आपण दिवसातून कमीत कमी तीनदा तरी आळवतो. पण हीच मुलं शेजारच्या घरात असली की आगाऊ आणि भोचक वाटू लागतात. इशीत भट्ट हा मुलगा नेमका 'केबीसी'मध्ये महानायक अमिताभ बच्चन यांच्यासमोर आल्यामुळे या प्रसंगाची प्रसिद्धी कमालीची वाढली. अमिताभ बच्चन यांच्याबद्दल ज्या भावना, जी आदरयुक्त भीती, जे दडपण मोठ्यांना येतं, तसं इशीत भट्टला वाटणं शक्यच नाही. अमिताभ बच्चनला प्रत्यक्ष समोर बघताना अतिउत्तेजित होऊन 'अजि म्या ब्रह्म पाहिले' या भावनेने भल्याभल्यांना सुचेनासे होते, हे आपण अनेकदा बघितले आहे. पण इशीतच्या पिढीने केवळ केबीसीमध्ये आणि जाहिरातीतच त्यांना बघितलं असण्याची शक्यता आहे आणि तेही घरी नियमित केबीसी बघितले जात असेल तरच. पालकांनी अमिताभच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका इशीतला सांगितला असेलही. पण ती माहिती गांभिर्याने घेण्याचं त्याचं वय नाही आणि तेवढी त्याला समजही नाही. इशीत उद्धटपणे, आगाऊपणे वागला असं भाष्य करणाऱ्यांनी लहान मुलांचे नृत्याचे आणि संगीताचे रिलिटी शो बघावेत. लहान मुले बघत असलेल्या कार्टून्समधल्या पात्रांचा अभ्यास करावा. जाहिरातीतली लहान मुलं बघावीत आणि रोजच्या हिंदी आणि मराठीमधल्या संस्कारी मालिका बघाव्यात.जेमतेम अर्धा तास इशीत हॉट सीटवर होता आणि तेवढ्याच वेळात त्याच्या वागण्यावर गदारोळ उठला. ज्यावेळी याच वयाची मुलं रिॲलिटी शोमध्ये नृत्य करतात, गाणी गातात, त्यावेळी तर अनेकदा वयाला न साजेशा गाण्यांची निवड केली जाते. त्यावर नृत्य करताना उत्तेजक हावभाव, विचित्र स्टेप्स बघणं असह्य होतं. या शोमधले परीक्षकही डोकं गहाण ठेवून केवळ कौतुक करण्यासाठी आणि छचोरपणा करण्यासाठी बसलेले असतात. परफॉर्मन्सच्या मध्ये सुरू असलेली हुल्लडबाजी आणि वाह्यातपणा बघता संतापाशिवाय दुसरी कोणतीच भावना मनात येत नाही. स्पर्धकांच्या जोड्या जमवल्या जातात, त्यांना एकमेकांवरून चिडवलं जातं. प्रपोज करणं, क्रश, ब्रेकअप, लव्ह ट्रँगल... ही भाषा सतत वापरली जाते आणि या प्रकाराचं प्रचंड कौतुक केलं जातं. म्हणजे प्रत्यक्षातही असंच वागायचं असतं अशी स्पर्धकांची समजूत होतेच, पण बघणाऱ्या असंख्य लहान मुलांचीही खात्री होते. परफॉर्मन्सवर टिप्स, चुका समजावणं, सुधारणा करणं या बाबी महत्त्वाच्या नसतातच. प्रत्येक परीक्षक शब्दकोषात कौतुकभरल्या नवीन शब्दांची मोलाची भर टाकण्याचे काम नेमाने करत असतो. फक्त कौतुक आणि तोंडी लावायला रडणं. रडणं हे भावनिक बुद्ध्यांक दाखवणारं. त्याचं प्रदर्शन पण अत्यावश्यक. स्पर्धक, परीक्षक, प्रेक्षक यांनी टिपं गाळून आपल्या 'संवेदनशीलतेचं प्रदर्शन करणं' ही अट पाळली की पुढच्या राऊंडच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा. शास्त्र असतं ते. त्यामुळे टिपं गाळण्याचं हे संसर्गजन्य अस्त्र कायम सगळेचजण भात्यात ठेवून असतात.अशा रिलिटी शोवर कुणीच काहीच कसं बोलत नाही? इशीत तर फक्त अर्धा तास पडद्यावर होता. बाकी शोमधील मुलं तर दर आठवड्याला पडद्यावर येतात आणि परीक्षक आणि स्पर्धकांचे निरर्थक संवाद, माकडचाळे बघावे लागतात. निषेध करायचा, टीका करायची किंवा गदारोळ करायचा, तर केबीसीतल्या इशीतवरच का? तसंच अनेकांच्या घरी टीव्हीवर मालिका बघितल्या जातात. वडीलधारी बघतातच, पण त्याचा कळत-नकळत परिणाम लहानांवरही होत असतो. शून्य अभिरूची आणि बुद्धीशी फटकून असलेल्या या मालिकांमध्ये नकारात्मक व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण इतक्या जास्त प्रमाणात दाखवले जाते की अशी पात्रं प्रत्यक्षातही असणार, यावर लहान मुलांचा नक्कीच विश्वास बसू लागतो. फरशीवर तेल सांडवणं, पदार्थात मीठ/ तिखट ओतणं, गॅसचा नॉब उघडून ठेवणं, कपड्यांवर शाई सांडवणं... बालबुद्धीलाही लाजवतील अशा अभिनव कल्पनांचा सुकाळ असणाऱ्या या मालिका लहान पिढीवर काय परिणाम करत असतील याचा विचारही करवत नाही. हीच बाब मुलांच्या कार्टून शोबद्दल. त्यातली पात्रं तर कमालीची आगाऊ, वात्रट आणि वाचाळ असतात. लहान मुलं तर या कार्टून्सच्या आकंठ प्रेमात बुडालेली असतात. अशा वेळी त्यांचं अनुकरण मुलांनी केलं नाही तरच नवल.हे सगळे टीव्हीच्या माध्यमातून होणारे संस्कार. पण घरातल्या पालकांकडून काय घडतं? लहान मुलांनी काढलेली चित्रं, गायलेली गाणी, कविता, केलेला नाच, फॅन्सी ड्रेस या सगळ्यांचं शूटींग करून रील्स काढली जातात, पोस्ट केली जातात. मग त्यानंतर पडणारा कौतुकाचा आणि लाईक्सचा पाऊस.. हे सगळे कुळाचार घरी यथास्थित पार पडत असल्याने लहान मुलांना ते नॉर्मल वाटू लागतं. कौतुक, प्रसिद्धी, रील, फोटो या दैनंदिन जगण्यातल्या आवश्यक बाबी आहेत असा त्यांचा समज होत असेल तर नेमका दोष कुणाचा? मुलांनी काहीही केलं तरी टाळ्या पडल्याच पाहिजेत, हा पालकांचा अट्टाहास मुलांवरही परिणाम करतो. आपल्यावर टीका केलेली मुलांना अजिबात सहन होत नाही. कोणतीही कृती करण्याच्या आनंदापेक्षा त्याचं प्रदर्शन करणं मुलांना महत्त्वाचं वाटू लागतं. अगदी अतिरेक म्हणजे काही पालक मुलांच्या गुणपत्रिकासुद्धा समाजमाध्यमावर टाकतात. याशिवाय हल्लीच्या पालकत्वानुसार मुलं आणि आई-वडिलांचे मैत्रीपूर्ण संबंध असावेत असं शास्त्र आहे. पण प्रसंगी मैत्रीची मर्यादा ओलांडून ही मुले दादागिरी कधी करू लागतात हे समजतही नाही. त्यामुळे आजच्या कुटुंबात सगळ्यात जास्त धाक कुणाचा असेल, तर तो लहान मुलाचा. त्याची आवडनिवड, त्याचे हट्ट त्याच्या मागण्या, त्याचे लाड ही पालकांची प्राथमिकता झाली आहे. ही मुलं आई-वडिलांशी, आजी-आजोबांशी, पाहुण्यांशी उद्धटपणे बोलतात. अशा वेळी इशीतवरच दोषारोपण का?आज समाजात संस्कारवर्गाची खरी आणि महत्त्वाची भूमिका बजावली जाते आहे ती तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांद्वारे. या वेगवान त्सुनामीमध्ये सगळेच भरडून निघताहेत. पण खरी फरपट होते आहे ती लहान मुलांची. त्यांना या माध्यमाचे आकर्षण वाटणं, त्यावर विश्वास बसणं, त्यांनी या आभासी दुनियेचं अनुकरण करणं हे साहजिकच आहे, कारण त्यांचा जन्मच मुळी हातात स्मार्टफोन घेऊन झाला आहे. पण त्सुनामीच्या या लाटेत पालकही वाहवत जायला लागले तर कसं होईल? आज गोकुळाष्टमी म्हणजे दहीहंडीचा उत्सव, गणेशोत्सव म्हणजे मिरवणुका आणि ढोल, नवरात्र म्हणजे नऊ रंगाचे कपडे आणि गरबा, दिवाळी म्हणजे रोषणाई, फटाके आणि भेटवस्तू... असे लहान पिढीचे समज झाले आहेत. हे चुकीचे समज कुणामुळे? आपणच आपलं आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. खरं तर अशा वेळी एका दीपस्तंभाप्रमाणे आज पालकांनी आपल्या मुलांना योग्य मार्गदर्शन करणं गरजेचं आहे. मुलं कुठेही भरकटली तरी त्यांना त्यांचा दीपस्तंभ पालकांनी उपलब्ध करून दिला पाहिजे. दुर्दैवाने आजच्या वेगवान तंत्रयुगात पालकांच्या हाती मोजकेच पत्ते उरले आहेत. अनेक आगाऊ, अनावश्यक बाबींवर त्यांचा ताबा असूच शकत नाही. बाहेरच्या प्रत्येक प्रलोभनावर पालकांनी नियंत्रण ठेवणं अशक्य आहे. पण उरलेले हातातले पत्ते हे हुकुमाचे असणं ही आजच्या काळाची गरज आहे. मग पालकांनी नेमकं करावं तरी काय? पालकांनी इतरांना दोष न देता, आपलं लहानपण आठवावं. आई-वडिलांची वागणूक आठवावी. आपल्या स्वतःच्या पालकांचाच आदर्श समोर ठेवून वागलं नाही, तर भविष्य कठीण असणार आहे. म्हणूनच २०२५ च्या बालकदिनाच्या निमित्ताने 'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे। पालकांनी बालकांशी पालकासम वागणे।'

# पुण्यावर 'असुरक्षिततेची' गडद सावली




पुणे एकेकाळी निवांत, सुसंस्कृत आणि सुरक्षित म्हणून ओळखले जाणारे शहर. शिक्षण, संस्कृती, तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रगतीच्या बळावर पुण्याने 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' ही ओळख कमावली. पण आज झपाट्याने वाढणाऱ्या शहरावर 'असुरक्षिततेची' ती एक गडद सावली पडू लागली आहे.पुणे शहर हे एकेकाळी पेन्शनरांचे शहर म्हणून ओळखले जात होते. शिक्षण, संस्कृती आणि शांत जीवनशैलीसाठी प्रसिद्ध असलेल्या या शहराने गेल्या दोन दशकांत झपाट्याने नागरीकरण अनुभवले आहे; परंतु या विकासाच्या वेगात सुरक्षा, पर्यावरण, वाहतूक, सामाजिक मूल्ये आणि नागरी जबाबदारी यांचा समतोल बिघडताना दिसत आहे. आज पुणे विविध स्तरांवर असुरक्षित बनत चालले आहे मग ती शारीरिक सुरक्षा असो, महिलांची वा मुलींची सुरक्षितता असो, वाहतुकीचे अनियंत्रित स्वरूप असो, की वाढत्या प्रदूषणामुळे धोक्यात आलेले प्रदूषण असो. पुणे शहरात सध्या गुन्हेगारीचा आलेख वाढत चालला आहे. कोयता गँग, घायावळ टोळी, आंदेकर टोळी या टोळ्यामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे.पुणे शहर पोलीस आयुक्तालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांत गंभीर गुन्ह्याचे प्रमाण तब्बल ३० टक्क्यांनी वाढले आहे. चोरी, घरफोडी, वाहनचोरी, खून, बलात्कार, तसा सायबर फसवणूक या घटना दररोज वाढत चालल्या आहेत. २०२४ मध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी मोठा हिस्सा हा सायबर गुन्ह्यांत आहे. ऑनलाइन फसवणूक, फेक लिंकद्वारे पैसे उकळणे, सोशल मीडियावरील छळवणूक आणि बनावट गुंतवणूक योजनांच्या जाळ्यात अडकवले जात आहे. डिजीटल पुणे बनवण्याच्या नादात सायबर गुन्हेगारी वाढत आहे. ऑनलाइन फसवणुकीच्या नव्या पद्धतीत दर आठवड्याला समोर येतात. २०२५ मध्ये १५,००० हून अधिक नागरिक सायबर गुन्ह्यांचे बळी ठरल्याची नोंद आहे. ताण वर्ग आणि ज्येष्ठ नागरिक हे या जाळ्यात सर्वाधिक अडकतात. 'केवायसी अपडेट','बँक लिंक अपडेट','गुंतवणुकीवर दुप्पट परतावा' अशा प्रलोभनांनी खाते रिकामे केले जात आहे. असुरक्षिततेच सर्वात ठळक चेहरा म्हणजे पुणे शहरातील सध्याची वाहतूक आहे. शहरातील वाहतूक ही मृत्यूचा सापळा बनली आहे. पुण्यातील रस्त्यांवर दररोज कोट्यवधी वाहने धावतात, पण सुरक्षिततेकडे मात्र दुर्लक्ष होत असते. २०२४ मध्ये वाहतूक विभागाच्या अहवालानुसार, शहरात दर महिन्याला सुमारे ८० अपघातांमध्ये प्राणहानी होते. पादचारी आणि दुचाकीस्वार सर्वाधिक बळी पडतात. दुचाकी पार्किंग, सिग्नल तोडणे, मद्यपान करून वाहन चालवणे आणि हेल्मेट/सीटबेल्ट अभाव हे रोजचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, शहरात सीसीटीव्ह प्रणाली असतानाही अंमलबजावणीतील ढिलाईमुळे शिस्त नजरेआड होत असते. पुणे शहर हे एकेकाळी महिलांसाठी सुरक्षित शहर मानले जायचे. महिला सुरक्षितपणे सहज फिरू शकत होत्या. पण, आताच्या काळात पुणे शहरात महिलांच्या वाढत्या असुरक्षितता हा चिंतेचा विषय बनला आहे. 'सुरक्षित पुणे' हा महिलांसाठी भ्रम झाला आहे. रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या महिलांवर होणारा छेडछाडीचा प्रकार, सार्वजनिक वाहतुकीत होणारी गैरवर्तणूक, तसेच कामाच्या ठिकाणी मानसिक छळ या तक्रारी वाढत आहेत. काही भागांमध्ये विशेषत हडपसर, बाणेर, वाकड, आणि कात्रज परिसरात महिलांच्या सुरक्षेसंदर्भात वारंवार प्रश्न उपस्थित होतात. पोलिसांची उपस्थिती कमी, रस्त्यांवर असलेला अंधार आणि सीसीटीव्ही असून चालू अवस्थेत नसतात याचा फायदा घेण्यात येतो. शहरात वाढता विस्तार पाहता हरित क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पाऊस पडला की, शहर तुंबायला सुरुवात होते. तर, उन्हाळ्यात पाण्याच्या टँकरची लाईन लागते. मुळा-मुठा नदी प्रदूषणही पुणेकरांच्या आरोग्यास धोकादायक ठरत आहे. त्यामुळे पिण्याचे पाणीही असुरक्षित झाले आहे. वृक्षतोड, वाहनांमधील धूर यामुळे हवेतील प्रदूषण वाढत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

प्रशासनाची भूमिका आणि नागरिकांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची असते. पुणे महानगरपालिका आणि पोलीस विभाग सतत उपाययोजना जाहीर करतात. सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे, रात्री गस्त, वाहतूक नियंत्रण केंद्रे आणि जनजागृती मोहिमा आहेत. पण केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नाहीत. नागरिकांनीही स्वत: जबाबदारी ओळखणे गरजचे आहे. नियमांचे पालन, शिस्तबद्ध वाहन चालक, शेजारी सुरक्षा संकल्पना ही काळी गरज आहे. शहर नियोजनातील त्रुटी आहेत. त्या वेळीच दूर केल्या पाहिजेत. पुणे विस्तारत असताना शहरी नियोजनात सुरक्षेला आवश्यक ते प्राधान्य मिळालेले नाही. रस्त्यांवरील अंधार, अप्रुया फुटपाथ, बसथांब्यांवरील सीसीटीव्हीअभावी आणि पाणथळ भागांतील अस्वच्छता ही सर्व असुरक्षिततेची जननी ठरतात. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत अनेक योजना राबवल्या गेल्या तरी त्यांची अंमलबजावणी अर्धवट राहिली असल्याचे चित्र आहे.पुण्याला पुन्हा सुरक्षित शहर म्हणून उभे करण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न आवश्यक आहे. वाहतूक व्यवस्थेसाठी शिस्तबद्ध नियम अंमलात आणणे आणि कठोर दंडाची अंमलबजावणी गरजेची आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीसांची अधिक गस्त, सीसीटीव्ही नेटवर्क वाढविणे गरजेचे आहे. तसे त्यांना सुरक्षित प्रवास करण्याची हमीही मिळाली पाहिजे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. पर्यावरण रक्षणासाठी अनेक मोहिमा राबवणे अत्यावश्यक आहे. नागरिकांनी स्वत: पुढाकार घेत सुरक्षित शहर होण्यासाठी सहभाग घेणे आवश्यक आहे. पुणे हे केवळ एक शहर नाही, तर ती एक भावना आहे. संस्कृतीचे शहर आहे. असुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले, तर हे शहर आपली ओळख गमावेल. सुरक्षित पुणे हे केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. कायदा, संस्कृती, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारी या सर्व पातळ्यांवर जर आपण सजग राहिलो, तर पुणे पुन्हा एकदा आदर्श आणि सुरक्षित शहर म्हणून उभे राहील अशी खात्री आहे.

# मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण निर्णय; सहकारी बँकांना ८२७ कोटींचे भागभांडवल, न्यायालय सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मंत्रिमंडळाने आज मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत सहकार, विधी व न्याय, वित्त आणि जलसंपदा विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयांमध्ये नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना एकूण ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल, न्यायालयीन संकुल आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षकांची तरतूद, पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवणे तसेच हिंगोली जिल्ह्यातील दोन साठवण तलाव प्रकल्पांसाठी २१४ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी यांचा समावेश आहे. हे निर्णय राज्याच्या आर्थिक स्थैर्य, न्याय व्यवस्थेच्या सुरक्षिततेसह ग्रामीण विकासाला चालना देणारे ठरणार आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयांची संक्षिप्त माहिती मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाच्या जनसंपर्क कक्षाकडून जारी करण्यात आली. या निर्णयांमुळे सहकारी क्षेत्राला मजबुती मिळेल, न्यायालयीन व्यवस्थेची सुरक्षा वाढेल, स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय आधार मिळेल आणि हिंगोलीसारख्या मागास जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नवे प्रकल्प राबवता येतील.

**सहकार विभाग : नाशिक, नागपूर व धाराशिव मध्यवर्ती बँकांना ८२७ कोटींचे भागभांडवल**

सहकार विभागाच्या निर्णयानुसार, नाशिक, नागपूर आणि धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय भागभांडवल म्हणून एकूण ८२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या बँकांना स्थानिक शेतकरी, छोटे उद्योजक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी हा निधी उपलब्ध होईल. या निर्णयामुळे बँकांचे भांडवल वाढेल, कर्जवाटप क्षमता सुधारेल आणि सहकारी बँकिंग व्यवस्थेला नवीन गती मिळेल. राज्य सरकारच्या सहकार धोरणानुसार, अशा प्रकारची भागभांडवल तरतूद ग्रामीण भागातील आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणारी आहे. या निर्णयाचा फायदा लाखो शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांना होईल, अशी अपेक्षा आहे.

**विधी व न्याय विभाग : न्यायालयीन संकुल व निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षक**

विधी व न्याय विभागाच्या निर्णयात न्यायालयीन संकुल आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेत वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून अतिरिक्त सुरक्षारक्षक उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. या उपक्रमासाठी लागणारा खर्च आणि तरतुदीला मंत्रिमंडळाने हिरवी झेंडा दिला आहे. वाढत्या धमकी आणि सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, न्यायाधीशांच्या सुरक्षिततेसह न्यायालयीन कार्यप्रणाली अधिक प्रभावी होईल. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे सरकारचे स्वतःचे उपक्रम असल्याने, या



रक्षकांची नियुक्ती जलद आणि विश्वसनीय होईल. या निर्णयामुळे राज्यातील सर्व उच्च आणि खालच्या न्यायालयांमध्ये सुरक्षेचा दर्जा उंचावेल, ज्यामुळे न्यायदान प्रक्रिया अधिक सुरक्षित राहील.

**वित्त विभाग : पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल अंमलबजावणीचा कालावधी वाढला**

वित्त विभागाच्या निर्णयानुसार, पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यात आला आहे. हा कालावधी आता १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे. वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना (महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या) निधी वाटप आणि आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी हा कालावधी वाढवण्यात आला आहे. या निर्णयामुळे महानगरपालिका आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना अतिरिक्त वर्षभराचा वेळ मिळेल, ज्यामुळे विकासकामांना गती येईल आणि आर्थिक नियोजन अधिक सुसंगत होईल. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे स्थानिक स्वशासन संस्थांच्या आर्थिक क्षमतेवर सकारात्मक परिणाम होईल, असे वित्त विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**जलसंपदा विभाग : हिंगोलीत दोन साठवण तलाव प्रकल्पांसाठी २१४ कोटींची तरतूद**

जलसंपदा विभागाने हिंगोली जिल्ह्यातील दोन महत्त्वपूर्ण साठवण तलाव प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यापैकी डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प हिंगोली जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा भागवण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, सेनगाव तालुक्यातील सुकळी साठवण तलाव प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे एकूण २१४ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी खर्च होईल, ज्यामुळे मराठवाडा भागातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल.या प्रकल्पांमुळे हिंगोली जिल्ह्यातील शेकडो हेक्टर जमीन ओतली जाईल, नवीन सिंचन सुविधा निर्माण होतील आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. जलसंपदा विभागाने सांगितले की, हे प्रकल्प पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरून राबवले जातील आणि स्थानिक रोजगार निर्मितीला चालना मिळेल. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी हे प्रकल्प वरदान ठरतील, असे जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.या मंत्रिमंडळ निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांना चालना मिळेल. सहकारी बँकिंगला मजबुती, न्याय व्यवस्थेची सुरक्षा, स्थानिक संस्थांचे वित्तीय सशक्तीकरण आणि जलसंपदा विकास हे सर्व राज्याच्या एकात्मिक विकास धोरणाचा भाग आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने सांगितले की, या निर्णयांची सविस्तर माहिती लवकरच विभागीय पातळीवर प्रसिद्ध केली जाईल आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जारी होणार आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, हे निर्णय येणाऱ्या अर्थसंकल्पीय घोषणांसाठी आधारभूत ठरतील आणि राज्याच्या आर्थिक आरोग्याला बळकटी देणारे आहेत

## AI तंत्रज्ञानावर आधारित अद्यावत टोल नाका सुरू करा!–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



दैनिक वादळ वार्ता
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या उत्तरेकडील प्रवेशद्वारावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा आणि वायू प्रदूषणाचा त्रास संपविण्यासाठी दहिसर टोलनाक्याऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून टोल भरणा प्रक्रिया वेगवान करण्याचा नवा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले .मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल कुंभारे (बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय), भारतीय राष्ट्रीय महामार्ग, दत्ता शिंदे (अतिरिक्त पोलिस आयुक्त मिरा -भाईंदर), प्राधिकरणाचे संचालक अंन्शुमली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक सुहास चिटणीस, जयंत म्हैसकर (मुख्य व्यवस्थापकीय संचालक चएझ इन्फास्ट्रकचर , न.कृ. वेंगुर्लेकर (सहाय्यक आयुक्त ब्रह्ममुंबई महापालिका) दिपक खांबित ( नगर अभियंता,मिरा -भाईंदर) आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.मंत्री सरनाईक म्हणाले की, दहिसर टोलनाक्यावर दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे म्बुलन्स, स्कूलबस आणि अत्यावश्यक सेवांना अडथळा निर्माण होतो. यामुळे प्रदूषणात भर पडते आणि प्रवाशांचा मौल्यवान वेळ वाया जातो. हा टोल नाका स्थलांतरित करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. परंतु स्थानिक नागरिकांनी टोल नाक्याच्या स्थलांतरनाला विरोध केला आहे. त्याची बाजू देखील रास्त असून त्यांच्या भुमिकेचा विचार करून टोल नाक्यावरील गर्दी टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवीन टोल भरणा प्रक्रिया चालू करण्यासंबंधीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सध्याचा टोल नाका कायमस्वरूपी बंद करणे शक्य होईल.

**AI–आधारित टोल प्रणालीचा नवा युगप्रवेश!**

मंत्री सरनाईक यांनी पुढे सांगितले की, टोल वसुली अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करावी.

वाहनांच्या नंबर प्लेट स्कॅन करणाऱ्या AI कॅमेऱ्यांद्वारे स्वयंचलित टोल भरणा होईल, ज्यामुळे टोल नाक्यांवरील लांबच लांब रांगा भूतकाळात जातील.तसेच, दोन टोलनाक्यांचा भरणा एकाच ठिकाणी करण्याची संकल्पना अमलात आणल्यास वाहतूक आणखी सुरळीत होईल, असेही त्यांनी सांगितले.

## माझ्यासाठी अजित दादांचा कार्यकर्ता हेच पद सर्वोच्च:अमोल मिटकरींची पहिली प्रतिक्रिया

दैनिक वादळ वार्ता

**अकोला (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नुकतीच प्रवक्त्यांची नवी यादी जाहीर केल्यानंतर, त्यातून आमदार अमोल मिटकरी आणि पुणे येथील नेत्या रुपाली पाटील-ठोंबरे यांची नावे वगळण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावरून माध्यमांमध्ये त्यांची प्रवक्तेपदावरून हकालपट्टी झाल्याचे वृत्त आले होते. अखेर या चर्चांवर आमदार अमोल मिटकरी यांनी प्रथमच प्रतिक्रिया देत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तसेच आपल्याला पक्षाकडून कोणतेही पत्र आले नसल्याचे सांगत, एकप्रकारे हकालपट्टी झाली नसल्याचा दावाच मिटकरी यांनी केला.अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सोमवारी रूपाली पाटील व आमदार अमोल मिटकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्ते पदावरून उचलबांगडी करण्यात आली. यानंतर अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर शायरीच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. तसेच त्यांनी सोशल मीडिया हँडलवरील 'बायो'मधून 'प्रवक्ता' या पदाचा उल्लेख तत्काळ हटवला होता. त्यांच्या बायोमध्ये आता फक्त 'सदस्य, विधान परिषद सभागृह' असा उल्लेख दिसून येत आहे.



अमोल मिटकरी यांनी नुकसाच माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना प्रवक्तेपदावरून हकालपट्टी केल्याबाबत प्रश्न विचारल असता, 'हकालपट्टी' आणि 'उचलबांगडी' हे शब्द माध्यमांनी 'चवीने' लावल्याचे अमोल मिटकरी यांनी म्हटले. तसेच, याबाबत पक्षाकडून कोणतेही अधिकृत पत्र आले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आज अजित दादांच्या विचाराचा प्रचारक आणि कार्यकर्ता म्हणून आपल्याकडे असलेले पद सर्वोच्च आहे. अजित दादांचा कार्यकर्ता असण्यासाठी नशिब लागते आणि तितका नशिबवान मी आहे, असे अमोल मिटकरी म्हणाले.दरम्यान, प्रवक्ते पदावरून हकालपट्टी झाल्यानंतर अमोल मिटकरींनी सोशल मीडियावर दोन ओळींची एक शायरी पोस्ट करत संयम आणि प्रतीक्षेचा संदेश दिला होता. दुनिया दौडनेवालों की है, लेकिन मंजिले सब्र वालों को मिलती है! या शायरीतून मिटकरींनी थेट काही न बोलता, परिस्थितीला सामोरे जाण्याचा संयमी सूर लावला आहे. धावणाऱ्यांच्या या जगात संयम ठेवणाऱ्यांनाच ध्येय गाठता येते, असा भाव या ओळींमधून दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.अमोल मिटकरी हे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यांनी पार्थ पवार यांच्या प्रकरणातही पक्षाची जोरकसपणे भूमिका मांडली होती. पण त्यांच्या काही टोकाच्या भूमिकांमुळे सत्ताधारी महायुतीत मतभेद निर्माण होण्याची स्थिती येत होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाला वेळोवेळी अडचणीत यावे लागले होते. अलीकडेच त्यांनी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या जातपडताळणीची मागणी करणारे ट्विट केलं होतं. पक्षातील नाराजी वाढल्यानंतर त्यांना ते ट्विट डिलीट करावे लागले. त्याआधी पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळा प्रकरणात पाठिंबा दर्शवणारे ट्विट केल्यानेही पक्षात अस्वस्थता निर्माण झाली होती. त्यामुळे पक्षाने त्यांना प्रवक्तेपदापासून तूर्त दूर ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

## स्फोटाची घटना अत्यंत हृदयद्रावक–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता

**अकोला (वृत्तसंस्था)**–भारताच्या राजधानी दिल्ली येथील लाल किल्ला परिसरात झालेल्या कार ब्लास्टनंतर पुणे रेल्वे स्थानकावर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बल यांच्यासह डॉग स्कॉड, बॉम्ब शोधक पथक यांच्याकडून बॅगची आणि स्थानक परिसराची कसून तपासणी सुरू करण्यात येत आहे.तसेच महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत देखील हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईच्या सीएसएमटी परिसरात पोलिसांनी सुरक्षा वाढवली आहे. खबरदारी म्हणून सर्व रेल्वे स्थानकांवर पोलिसांकडून तपासणी केली जात आहे. संशयित व्यक्तींची झाडाझडती घेतली जात आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, त्यामुळे दिल्लीनंतर मुंबईत देखील पोलिसांचा चांगलाच तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे.



# ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी विविध प्रवर्गांचे आरक्षण जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला), सर्वसाधारण महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता राम गणेश गडकरी रंगायतन येथे प्रशासक तथा महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली आज आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी ०५ जागा, अनुसूचित जमाती (महिला) प्रवर्गासाठी ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) १८ जागा आणि सर्वसाधारण (महिला) प्रर्वगातील ४१ जागांची सोडत काढण्यात आली. अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी, सहाय्यक आयुक्त (निवडणूक) बाळू पिचड यांच्या उपस्थितीत महापालिका शाळेमधील विद्यार्थिनींच्या हस्ते ही आरक्षण सोडत काढण्यात आली. या संपूर्ण सोडत प्रक्रियेचे नेटके संचालन उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी यांनी केले. ठाणे महापालिकेच्या शाळा क्र. ७ मधील आठवी इयत्तेत शिकणाऱ्या पिहू गौंड आणि अंशिका प्रजापती या विद्यार्थिनींच्या हस्ते सोडत काढण्यात आली. ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १८,४१,४८८ इतकी आहे. त्यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या १,२६,००३, अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४२,६९८ इतकी आहे. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे, महापालिकेच्या एकूण १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ०९ जागा, अनुसूचित जमातींसाठी ०३ जागा, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आहेत. एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत. त्यापैकी, अनुसूचित जातींच्या ०५ जागा, अनुसूचित जमातींच्या ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १८ जागा आणि सर्वसाधारण प्रर्वगातील ४१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. ठाणे महानगरपालिकेत एकूण ३३ प्रभाग आहेत. त्या पैकी, ३२ प्रभाग हे चार सदस्यीय असून ०१ प्रभाग तीन सदस्यीय आहे. या ३३ प्रभागातून ठाणे महानगरपालिकेत एकूण १३१ सदस्य निवडले जाणार आहेत. त्यांची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.



# पाटोद्यात उभे राहतंय श्री स्वामी समर्थांचे भव्य दिव्य मंदिर

दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील स्वामी समर्थ भक्तांची दीर्घ प्रतीक्षा संपली आहे. शहरात ५० बाय ४० च्या जागेत श्री स्वामी समर्थ मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू असून दोन महिन्यांत स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. या मंदिरासाठी देशमुख कुटुंबीयांनी जागा उपलब्ध करून दिली, तर आमदार सुरेश धस आणि प्राजक्ता काकू धस यांच्या पाठपुराव्यातून तब्बल २५ लाखांचा निधी मंजूर झाला होता आणि काही दिवसांपूर्वी याचे प्रत्यक्ष काम देखील सुरू झाले शनिवार दिनांक ,८ रोजी कृषीभूषण आबासाहेब मोरे यांनी पाटोदा शहरात स्वामी समर्थ मंदिराच्या कामाच्या ठिकाणी भेट दिली यावेळी त्यांनी कामाच्या दर्जाबाबत समाधान आणि आनंद व्यक्त करून आमदार सुरेश धस यांचे देखील आभार मानले यावेळी आमदार धस यांच्याशी त्यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली तर धस यांनी स्वामी समर्थांची सेवा हे आपले भाग्य असून मंदिराच्या कामासाठी आणखी २५ लाखांचा निधी आपण उपलब्ध करू असे आबासाहेब मोरे यांना सांगितले.

पाटोदा शहरातील स्वामी समर्थ केंद्र तात्पुरते संत नरहरी महाराज मंदिरात चालवले जात होते. सेवेकरांनी मंदिर बांधकामाची मागणी आमदार धस यांच्याकडे केली होती, त्यानंतर शासनस्तरावर प्रयत्न होऊन निधी उपलब्ध झाला आता वेगात काम सुरू असून पुढील काही महिन्यांमध्ये एक काम पूर्ण देखील होणार आहे दर्जेदार कामामुळे भाविक भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे शहरातील क्रांतीनगर भागात बंडू देशमुख आणि त्यांच्या कुटुंबाने या मंदिरासाठी तब्बल पन्नास बाय ४० ची जागा उपलब्ध करून दिली त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आणि आता स्लॅब चे काम देखील पूर्ण झाले आहे श्री स्वामी समर्थ गुरु पिठाचे प्रमुख परमपूज्य अण्णासाहेब मोरे माऊली यांचे चिरंजीव आणि कृषी भूषण आबासाहेब मोरे यांनी शनिवारी



अचानक पाटोदा शहरात भेट दिली यावेळी सेवेकरांच्या वतीने गुरुमाऊलींचे प्रचंड मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले पाटोदे करांच्यावतीने नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव आशाताई कोल्हे यांनी कृषिभूषण आबासाहेब मोरे यांचे स्वागत केले. यावेळी गुरुमाऊली यांना सेवेकरांनी नवीन मंदिराच्या कामाच्या ठिकाणी येण्याची विनंती केली या विनंतीस मान देऊन आबासाहेब मोरे यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली आणि सेविकाऱ्यांशी संवाद साधला यावेळी सोमीनाथ कोल्हे यांनी त्यांना मंदिर कामाची देखील माहिती दिली.यावेळी नगराध्यक्ष जाधव यांनी आमदार सुरेश धस यांना दूरध्वनीवरून ही माहिती देताच आमदार सुरेश धस यांनी देखील आबासाहेब मोरे यांचे आशीर्वाद घेतले आणि मंदिराच्या कामासाठी श्री स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने कोणतीही कमी पडणार नाही आणि हे काम आपल्या माध्यमातून होत आहे हे स्वामींचे आशीर्वाद आहेत असे संवाद साधत मंदिराच्या वरच्या मजल्याच्या कामासाठी आणखी २५ लक्ष रुपयांचा निधी लवकरच उपलब्ध करून देऊ असे आमदार सुरेश धस यांनी यावेळी सांगितले सदरच्या कामासाठी स्वामी समर्थ सेविकाऱ्यांसह आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी २०१९ पासून पाठपुरावा सुरू केला होता त्याला यश मिळाले आणि आता हे मंदिराचे काम पूर्णत्वाकडे आहे या ठिकाणी श्री स्वामी समर्थ मंदिराच्या भव्य सभागृह तसेच गर्भागृह आणि इतर सर्व सोयी सुविधायुक्त असे आध्यात्मिक केंद्र होणार असून पाटोदेकर यांना ही मोठी अध्यात्मिक परभणी ठरणार असल्याची विश्वास कृषीभूषण आबासाहेब मोरे यांनी व्यक्त केला यावेळी सेवेकऱ्यांची या ठिकाणी प्रचंड मोठ्या संख्येने गर्दी होती.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रकरणी ट्रॉसीटी नुसार कारवाई करण्याची दीपक कांबळे यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री. बडेबाबा विद्यामंदिरच्या मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली नाही त्या प्रकरणी संस्थेची चौकशी करून दोषींवर ट्रॉसिटी नुसार कारवाई करण्याची मागणी रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केली आहे. दरम्यान या संस्थेच्या गैरकारभाराचीचौकश करण्याच्या मागणीसाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ हे मागील तीन दिवसा पासून आमरण उपोषणाला बसले अडून आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. उपोषणार्थीची प्रकृती खालावलेली आहे. मात्र उपोषणाचा चौथा दिवस सुरू आद्यप एकही अधिकारी फिरकलेला नाही किंवा उपोषणार्थीची जबाबदार अधिकारी व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट घेतली नसुन संस्थेची चौकशी झालेली नाही.



या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील श्री बडेबाबा विद्यामंदीर लहुरी शाळेत विषय शिक्षकांची ५ पदे मागील ८ वर्षा पासुन रिक्त आहेत. ती रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी. त्यामुळे ८ वर्ष झालेल्या विद्यार्थ्यांच्या नुकसानासाठी जबादार असणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करावी. मागील ८ वर्षापासुन शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गणुवत्ता ढासळलेली आहे. शिक्षकांची व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात यावी. या बाबत ग्रामसभेने सुद्धा ठराव घेतला आहे. सोबत जोडला आहे. श्री. बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ यांनी जागेचे बनावट व खोटे कागदपत्रे बनवुन शाळेने व संस्थेने शासनाची फसवणूक केलेली आहे. त्यांची चौकशी करून संबधीत दोषींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. शाळेच्या जागेचे शासना कडुन भाडे घेण्यात येत आहे. त्याच जागेचे मालक म्हणून मंगलबाई संपत खांडेकर यांनी शासनाचा पिक विमा योजनेचा लाभ घेवुन शासनाची दुहेरी फसवणुक केलेली आहे. त्या बाबतीत सखोल चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्यात यावी. शाळेची इमारत ही खाजगी व्यक्तीच्या नावे आहे. या इमारतीस नियमा प्रमाणे शासनाकडुन नियमित भाडे मिळत आहे; परंतु इमारत ही अत्यंत जीर्ण झालेली असुन भिंतीला भेगा पडलेल्या आहेत. तिथे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका होऊ शकतो. त्या बाबतीत संबधीत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. शाळेची इमारत धोकेदायक असल्याने शाळा दुसऱ्या जागेत स्थलांतरीत करण्यात यावी. सन २०१८ पासुन मागासवर्गीय शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्यात आलेली नाही. याच्यामध्ये दोषींवर कार्यवाही करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात यावी. नारदस्वामी विद्यामंदीर, बीड येथे कार्यरत असलेले शाळेचे सेवक गणेश बजरंग इतापे यांना सेवा जेष्ठते नुसार लिपीक पदावर नियुक्ती देणे आवश्यक असताना श्रीमती तनुजा दाबेकर यांची बेकायदेशीर केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी. या मागण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप चाळक आणि ग्रामपंचायत सदस्य भिमराव चाळक, पद्माकर चाळक, दत्ता चाळक यांच्यासह कृष्णा चाळक, अमित चाळक, प्रकाश चाळक, संजय चाळक हे दि. १० नोव्हेंबर पासून लव्हुरी येथील बडेबाबा विद्यामंदिर समोर चार दिवसा पासून आमरण उपोषणाला बसले आहेत.

### उपोषार्थीची प्रकृती खालावली

**उपोषणाच्या चौथ्या दिवशी उपोषणार्थी संदीप चाळक यांची प्रकृती खालावली असून त्यांचा रक्तदाब खालावला असल्याची माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले असून त्यांचा रक्तदाब अवघा ९० झालेला आहे.**

**" अनुसूचित जाती जमातीचे या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवणाऱ्या संस्थाचालक आणि अधिकारी यांच्यावर ट्रॉसिटी नुसार कारवाई करण्यात यावी. अन्यथा रिपाइंच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**– दीपक कांबळे,**
**तालुकाध्यक्ष, केज**

# नंदुरबार जिल्ह्याची विकासाची धुरा! स्थलांतर रोखण्या साठी रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकासावर भर

## प्रशासन झाले गतिमान, रोखणार स्थलांतराची वाट!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या विकासाला आणि ग्रामीण भागातील उपजीविकेला नवी दिशा देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी कंबर कसली आहे. नुकत्याच झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी स्थलांतर रोखण्यासाठी आणि शाश्वत मालमत्ता निर्मितीसाठी ठोस पाऊले उचलण्याचे निर्देश दिले. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जनसहभाग या त्रिसूत्रीवर प्रशासनाचा जोर असणार आहे. स्थलांतर हा जिल्ह्याच्या विकासातील मोठा अडथळा ओळखून डॉ. सेठी यांनी स्थलांतर बीटमधील कामांवर विशेष संनियंत्रण ठेवण्याचे आदेश दिले आहेत. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती करून स्थलांतरावर नियंत्रण मिळवणे.

वृक्ष लागवड, फळबाग आणि शाळा दुरुस्ती यांसारख्या कामांतून दीर्घकाळ टिकणाऱ्या शाश्वत मालमत्ता निर्माण करण्याचा संकल्प आहे. वन विभागाच्या कामांना तात्काळ सुरुवात करून वर्क कोडची मागणी त्वरीत प्रणालीवर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासकीय यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी मनुष्यबळ व्यवस्थापनावरही लक्ष केंद्रित करण्यात आले.



अक्राणी तालुक्यात दोन कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड एम्प्लॉयमेंट ऑफिसर पदांची वाढ करण्यास सांगण्यात आले, तर दुसरीकडे निष्क्रिय कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड एम्प्लॉयमेंट ऑफिसर वर कारवाई करण्याचे कडक निर्देशही देण्यात आले. प्रत्येक तांत्रिक सहाय्यकाने आपल्या कामाची एक यशोगाथा सादर करावी, जेणेकरून कामात पारदर्शकता आणि सकारात्मकता येईल.

**आमुच्या नंदुरबारी, बाई सांगा एक बातमी,**
**कलेक्टर माई (माजी) बाई सेठी आल्या, घेऊन विकासाची हमी!**
**स्थलांतर थांबवायला, दिली त्यांनी दिशा,**
**रोजी–रोटी मिळेल आता, राहील नाही निराशा!**
**डोंगरमाथ्यावर कामांना लवकर लावा हात,**
**फळबागा, शाळा दुरुस्ती होईल रात्रंदिवस, काय बात!**
**वनखात्याची कामे आता निघणार लगबगीनं,**
**गरीब माणूस गावातच राहील, जाईल नाही दुनियेनं!**
**सिडियीओ बाईनो, कामावर धरा नीट लक्ष,**
**निष्क्रिय राहिला कोणी, तर मग नक्कीच शिक्षा!**
**पारदर्शकता, कार्यक्षमता, हाच आहे त्यांचा हेतू,**
**जनतेच्या साथीनं, विकास होईल नंदुरबारी सेतू!**
**प्रशासनाचं आहे प्राधान्य, ऐका सगळ्यांनी मिळून,**
**गावातच उपजीविका मिळवूया, सारे आनंदानं झुलून!**

# ॲड.बापूसाहेब जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती



दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्यनेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून आणि माध्यमातून ॲड. श्री. बापूसाहेब विठ्ठलराव जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काल, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे नगर पालिका इच्छुक उमेदवारांच्या मुलाखत सत्र कार्यक्रमात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी ॲड. जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ॲड. बापूसाहेब जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि जनसंपर्क कार्यात सक्रिय असून त्यांनी समाजसेवक म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. पुढे ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण यांचा प्रचार–प्रसार करत, शिवसेना पक्षाच्या बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करतील, असा विश्वास जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला. उपस्थिती शिवसेना पदाधिकारी तथा शिवसैनिकांनी ॲड. बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करत शिवसेना पक्षात स्वागत केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशाबद्दल दीपक नाना देशमुख यांचा साठेनगर मित्रमंडळाच्या वतीने सत्कार संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थिती मध्ये पक्षात प्रवेश केल्या बद्दल परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांचा सत्कार साठे नगर मित्र मंडळाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच पक्षप्रवेश केला. त्यानंतर ते परळी शहरात आले असता त्यांचा साठे नगर मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच परळी नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारास तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड मताने निवडून देत असे कार्यकर्त्यांनी आश्वासन दिले. याप्रसंगी अभिषेक मस्के, दिनेश मस्के,भैया मस्के, बंटी मस्के, अनिल मस्के, तसेच साठे नगर येथील सर्व तरुण युवक कार्यकर्ते यांनी पुष्पगुच्छ व शाल घालून दिपक नाना देशमुख यांचा सत्कार केला.

## वनहक्क संरक्षणाकडे महत्त्वाचे पाऊल!

# जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकुवा येथे ३७८ वनदाव्यांची सुनावणी संपन्न; पारदर्शक निकालाचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी अक्कलकुवा तहसील कार्यालयात जिल्हास्तरीय वनहक्क समितीची महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान अक्कलकुवा तालुक्यातील एकूण ३७८ वनदावे विचारार्थ घेण्यात आले, ज्यामुळे प्रलंबित वनहक्क प्रकरणांच्या निपटाराला गती मिळाली आहे.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी वनहक्क कायद्याचा मुख्य हेतू स्पष्ट केला. 'या कायद्याचा हेतू आदिवासी व पारंपरिक वननिवासींना त्यांच्या हक्कांचे कायदेशीर संरक्षण मिळवून देणे आहे,' असे त्यांनी नमूद केले. त्यांनी संबंधित



विभागांना स्पष्ट निर्देश दिले की, दावे निकाली काढताना पारदर्शकता आणि पुराव्यांची काटेकोर शहानिशा करावी, जेणेकरून केवळ पात्र लाभार्थ्यांनाच न्याय मिळेल. या बैठकीस जिल्हास्तरीय वनहक्क समितीचे सदस्य सचिव तथा प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, उपवनसंरक्षक तळोदा सुहास चव्हाण, अशासकीय सदस्य कांतीलाल पाडवी, जिल्हा समन्वयक हर्षल सोनार, जिल्हा व्यवस्थापक प्रकाश गावित, सहाय्यक रोशन चौरे, विक्रम गायकवाड, माकत्या वसावे, तसेच तालुका व्यवस्थापक दिपक पाडवी यांच्यासह अनेक प्रमुख सदस्य उपस्थित होते. सुनावणीदरम्यान सर्व दावेदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी सर्व अधिकारी व समिती सदस्यांना त्वरित, पारदर्शक व न्याय्य निर्णय प्रक्रिया राबवून प्रकरणे वेळेत निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत. या सुनावणीमुळे अक्कलकुवा तालुक्यातील वनहक्क प्रकरणांचा निपटारा गतीमान झाला असून, वननिवासींच्या हक्कसंरक्षणाच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

# चंदनसावरगाव येथील सीता बाई भंडारे यांचे दुखःद निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथील जेष्ठ महिला सीताबाई नामदेव भंडारे वय ९० वर्षे यांचे वृद्धापकाळाने बुधवार रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.चार मुले, चार मुली असा मोठा परिवार आहे.प्रेमळ स्वभावाच्या बाई म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. रामकीसन,राधाकिसन, श्रीकिसन,दत्तात्रय



यांच्या त्या आई होत.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात शोककळा पसरली आहे.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती, शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे बुधवारी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर प्राचार्या सौ. उमा जगतकर यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ.



कलाम यांच्या अग्निपंख या पुस्तकाची ओळख करून दिली. त्यांनी पुस्तकातील प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांसमोर मांडत वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन करून वाचाल तर वाचाल या संदेशाला प्रत्यक्ष कृतीतून उजाळा दिला. वाचन संस्कृती रुजविण्याचा संकल्प करत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.याप्रसंगी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### टि.सी.हरवला आहे

श्री.अशोक छगन कापरे, रा. कापरेवाडी, ता. केज, जि. बीड, यांचा इ.७ वी शै. वर्ष १९९३ चा टी.सी. केज–नांदूर बसने प्रवासादरम्यान हरवला आहे. सापडल्यास कृपया मो.क्र.९९२१७७९४९ या क्रमांकांवर संपर्क साधावा. हरवलेल्या टी.सी.चा गैरवापर झाल्यास मी जबाबदार राहणार नाही.

अशोक छगन कापरे
मु. कापरेवाडी, ता.
केज, जि. बीड.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077